जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 AUG 2018
Times of India

# SUK to offer spoken English, basic computer courses

Times News Network

**Kolhapur:** Over 30 courses targeted at making people more employable are on offer at Lokvikas Kendra (Centre for Community Development) at Shivaji University, Kolhapur (SUK).

The courses range in duration from three months to 12; fees range from Rs 300 to Rs 10,000. There are 22 courses which are more than six months long, while 12 will last less than four months.

A university official said these are basic, skill-based courses. Eligibility criteria for these courses are class X passed in some cases and for some courses a willing mind is all the eligibility required. Lokvikas Kendra will offer courses in Spoken English, Computer hardware maintenance, fitness training, operation theatre assistant, medical emergency services, film and drama acting certificate, gardening management and certificate courses in hospital management. An official from the Lokvikas Kendra said there are around 10 institutes in Kolhapur city, while the rest of the institutes could cater to students in urban as well as rural areas in Kolhapur, Sangli and Satara districts. An expert team will visit the institutes, and the approval to conduct these can be cancelled if institutes are found operating unsatisfactorily.

# नवनाथ गोरेंसोबत आज संवाद

कोल्हापूर टाइम्स टीम

साहित्य क्षेत्रात प्रतिष्ठेचा समजल्या जाणाऱ्या साहित्य अकादमीचा युवा पुरस्कारप्राप्त लेखक नवनाथ गोरे यांच्यासोबत मंगळवारी (ता. २१ ऑगस्ट) 'मटा युवा संवाद' कार्यक्रम रंगणार आहे. 'महाराष्ट्र टाइम्स'च्या सहाव्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून लेखकांशी संवाद या साहित्यिक उपक्रमाचे आयोजन केले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागात दुपारी बारा वाजता कार्यक्रम होणार आहे.

गोरे यांनी 'फेसाटी' कांदबरीत दुष्काळी भागातील चित्रण अंत्यत वास्तवदर्शी केले आहे. निसर्गाची अवकृपा, शेतकऱ्यांची दैन्यावस्था आणि प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करत वाटचाल करणाऱ्या तरुणाची कथा या कांदबरीत मांडली आहे. मराठी वाङमयातील या वेगळ्या साहित्यकृतीबद्दल गोरे यांना राष्ट्रीय पातळीवरील साहित्य अकादमी युवा पुरस्कार पुरस्कार जाहीर झाला.

'फेसाटी' या कादंबरीतून ग्रामीण भागातील अभावग्रस्त कुटुंबातील एका तरुणाची शिक्षणगाथा मांडली आहे. बोलीभाषेतील प्रवाही आत्मकथनात्मक शैली हे तिचे वैशिष्ट्य असून या कादंबरीला अनेक राज्य पुरस्कार मिळाले आहेत.

मंगळवारी आयोजित 'मटा युवा संवाद'मध्ये लेखक गोरे यांची जडणघडण उलगडणार आहे. गोरे हे सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील निगडी बुद्रुक येथील आहेत. 'महाराष्ट्र टाइम्स'च्या सहाव्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून 'मटा युवा संवाद'चे आयोजन केले आहे. या माध्यमातून लेखकांशी थेट संवाद साधता येणार आहे. साहित्यप्रेमींनी या कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन केले आहे.



**विद्यापीठाच्या मराठी विभागात 'मटा'च्या वतीने आयोजन**




**कार्यक्रमाचे स्थळ व वेळ**

शिवाजी विद्यापीठ, मराठी विभाग
मंगळवार (ता.२१)
दुपारी १२ वाजता